# “ भजन: गण गण गणात बोते…”

गण गण गणात बोते | हे भजन प्रिय सदगूरूते ||
या श्रेष्ठ गजानन गुरुते | तुम्ही आठवीत राहा याते ||धृ ||

हे स्तोत्र नसे अमृत ते | मंत्राची योग्यता याते ||
हे संजीवन आहे नुसते | व्यवहारीक अर्थ न याते ||१ ||

मंत्राची योग्यता कळते | जो खराच मांत्रिक त्याते ||
या पाठे दु:ख ते हरते | पाठका अती सूख होते ||

हा खचित अनुग्रह केला | श्री गजानने तुम्हाला ||
घ्या साधून अवघे याला | मनी धरून भाव भक्तीला ||२ ||

कल्याण निरंतर होई |
दु:ख ते मुळी नच राही ||

असल्यास रोग तो जाई | वासना सर्व पुरातीलहि ||
आहे याचा अनुभव आला | म्हणूनिया कथित तुम्हाला ||

तुम्ही बसून क्षेत्र शेगावी | स्तोत्राची प्रचिती पहावी ||
ही दंतकथा ना लवहि | या गजाननाची ग्वाही ||३ ||

|| इति समर्थ सदगुरु श्री गजानन महाराज की जय ||

ΩΩΩΩΩ

- संत श्री गजानन महाराज मंदीर, माले.